लोकमत

# खानोलकरांचे 'भीष्म प्रतिज्ञा' ठरले सर्वोत्कृष्ट नाटक

## ४२ वा दशावतारी नाट्य महोत्सव : नामवंत १८ नाटक कंपनींनी घेतला होता सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**सिंधुदुर्गनगरी :** ओरोस श्री देव रवळनाथ मंदिराच्या भव्य रंग मंचावर गेले १८ दिवस सुरु असलेल्या ४२ व्या दशावतारी नाट्य महोत्सव स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, या स्पर्धेचे प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या खानोलकर दशावतार नाट्य मंडळ खानोलीला मिळाले आहे.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक विठ्ठलादेवी दशावतारी नाट्य मंडळ राठीवडेने पटकाविला आहे, तर तृतीय क्रमांक आरोलकर दशावतारी नाट्य मंडळ आरवली यांना देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २० एप्रिल ते ८ मे या कालावधीत ओरोस येथील श्री देव रवळनाथ मंदिराच्या भव्य रंगमंचावर ४२ व दशावतारी नाट्य महोत्सव स्पर्धा २०१८-१९ आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जिल्ह्यातील १८ नाट्य मंडळांनी सहभाग घेतला होता. गेले १८ दिवस सुरु असलेल्या या नाट्यमहोत्सव स्पर्धेला येथील रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. अशोक भाईडकर, सुधाकर वळंजू, मोहन मेस्त्री लाभले होते. या परीक्षकांनी या स्पर्धेत सादर केलेल्या १८ नाट्य प्रयोगांचे बारकाईने निरीक्षण करुन सर्वोत्कृष्ट नाट्यप्रयोग, कलाकार व संगीतकार यांचे नंबर काढले.

यात सर्वोत्कृष्ट नाट्यप्रयोगामध्ये प्रथम- खानोलकर दशावतारी नाट्य मंडळाने सादर केलेल्या भीष्म प्रतिज्ञा याला मिळाला आहे. द्वितीय क्रमांक- विठ्ठलादेवी दशावतारी नाट्य मंडळ राठीवडे (गरुड झेप), तृतीय - आरोलकर दशावतारी नाट्य मंडळ आरवली (वृंदा जलंधर ), आणि उत्तेजनार्थ - श्री देव हेळेकर दशावतारी नाट्य मंडळ कारीवडे ( मृत्युंजय ), श्री सिध्देश्वर दशावतारी नाट्य मंडळ



दोडामार्ग (राजा हरिश्चंद्र तारामती), सर्वोत्कृष्ट अभिनय राजा - प्रथम - लक्ष्मण नांदोसकर (खानोलकर द. ना. मंडळ खानोली), द्वितीय - केशव खांबल (सिद्धेश्वर द. ना. मंडळ दोडामार्ग), तृतीय - विघ्नराजेंद्र कोंडुरकर (वावळेश्वर द. ना. मंडळ तेंडोली), उत्तेजनार्थ - कृष्णा धुरी (आरोलकर द. ना. मंडळ आरवली), पुरुषोत्तम खेडकर (लिंगरामेश्वर द. ना. मंडळ ओवळीये) सर्वोत्कृष्ट राणी - प्रथम - हरी सावंत (आरोलकर द. ना. मंडळ आरवली), द्वितीय - सुधीर तांडेल (आनंदीबाई अनंत बागवे द. ना. मंडळ अणाव), तृतीय - संतोष चाळके (विठ्ठलादेवी द. ना. मंडळ राठीवडे), उत्तेजनार्थ- विनोद परब (गुरुकृपा द. ना. मंडळ हळवल), अब्दुल नदाफ (सिध्देश्वर द. ना. मंडळ दोडामार्ग), सर्वोत्कृष्ट खलनायक - प्रथम - सुहास गावडे (हेळेकर द. ना. मंडळ कारीवडे), द्वितीय - सतीश केळुसकर (खानोलकर द. ना. मंडळ खानोली), तृतीय - बाबाजी मेस्त्री (विठ्ठलादेवी द. ना. मंडळ राठीवडे), उत्तेजनार्थ- संतोष पांग्रडकर (स्वयंभू द. ना. मंडळ पांग्रड), कृष्णा गोसावी (गुरुकृपा द. ना. मंडळ हळवल) सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार - प्रथम - शंकर नरे (घोडेश्वर द. ना. मंडळ हुमरमाळा), द्वितीय - भालचंद्र भारमल (हेळेकर द. ना. मंडळ कारीवडे), तृतीय - वैभव प्रभु ( लिंगरामेश्वर द.ना.मंडळ ओवळीये), उत्तेजनार्थ- संदीप मेस्त्री (आनंदी अनंत बागवे द. ना. मंडळ अणाव), सुहास माळकर (पराडकर फाउंडेशन द. ना. मंडळ आडवली), सर्वोत्कृष्ट नारद - प्रथम - नंदकुमार चव्हाण (लिंगरामेश्वर द. ना. मंडळ ओवळीये), द्वितीय - योगेश कोंडुरकर (वावळेश्वर द. ना. मंडळ तेंडोली), तृतीय - सुशांत वेंगुर्लेकर ( गौतमेश्वर द. ना. मंडळ दाभोलि), उत्तेजनार्थ- प्रथमेश मळगांवकर (हेळेकर द. ना. मंडळ कारीवडे), मारुती मेस्त्री (ओमभवानी द. ना. मंडळ राठीवडे), सर्वोत्कृष्ट संगीत - प्रथम - गुरुकृपा लो. द. ना. मंडळ हळवल, द्वितीय - हेळेकर द. ना. मंडळ कारिवडे, तृतीय क्रमांक - खानोली द. ना. मंडळ खानोली, उत्तेजनार्थ आरोलकर द. ना. मंडळ खानोली, गणेश द. ना. मंडळ कडावल यांनी पटकाविला आहे.

या नाट्य महोत्सव स्पर्धेत सर्वोत्कृष्ट नाट्य प्रयोग, अभिनय, विनोद आणि संगीतकार यांना बक्षीस बितरण समारंभाच्या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह प्रशस्तिपत्रक व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.